# कविता–२: रुक्मिणीचे श्रीकृष्णांस पत्र

– नरेंद्र

## परिचय :

**नरेंद्र पंडित अयाचित –** रामदेवरायाच्या दरबारी नरेंद्र, शैल्य व नृसिंह हे तीन भाऊ दरबारी कवी होते, यापैकी शैल्य याने 'रामायणावर रचना केली. तर नृसिंहाने 'नलोपाख्यान' रचले. नरेंद्राने श्री कृष्णचरित्रावर रचना करण्याची घोषणा केली. त्याप्रमाणे 'रुक्मिणी स्वयंवर' ही 1880 ओव्यांची रचना केली. नरेंद्र पंडित अयाचित यांनी 1293 मध्ये हा ग्रंथ पूर्ण केला. या काव्यातील शब्दसौंदर्य व अर्थसौंदर्य यामुळे राजाच्या मनात असूया निर्माण झाली. त्याने द्रव्यलोभ दाखवून ते काव्य आपल्या नावावर करण्यास सांगितले. नरेंद्राने यावर दिलेले उत्तर तडफदार होते. ''राजे हो : आमुचेया कविकुला बोलू लागेल,'' त्यावर राजाने धमकी दिली. म्हणून तीनही भावानी दुरुस्तीची सबब सांगून काव्य घरी नेले व एका रात्रीत त्याची नक्कल उतरवली. परंतु ते फक्त 900 ओव्याच नकलू शकले व ग्रंथ राजाकडे दिला. या घटनेमुळे राजाला उपरती झाली व त्याने महानुभाव संप्रदायी नागदेवाचार्यांचा मार्ग अनुसरला. नरेंद्राच्या नावे 900 ओव्यांपैकी 879 ओव्याच राहिल्या. त्यांच्या 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथातून खालील उतारा. घेतला आहे हा ग्रंथ श्री. वा. ना. उत्पात यानी संपादित केलेला आहे.

## पार्श्वभूमी :

विदर्भ देशीच्या भीमक राजाला पाच पुत्र व एक कन्या होती. राजाला आपल्या कन्येचा म्हणजे रुक्मिणीचा विवाह श्री कृष्णाबरोबर करुन द्यायचा होता. परंतु युवराज रुक्मिणीच्या भावाला (रुक्मि) हे मान्य नव्हते. रुक्मि हा बलशाली होता. त्याने आपल्या बहिणीचा विवाह चेदीचा राजा शिशुपाल याच्याशी निश्चित केला. परंतु रुक्मिणीच्या मनात श्रीकृष्णाशी विवाह करावयाचा होता. म्हणून तिने 'सुदेव' या गुरु व ब्राह्मणाकडून श्री कृष्णाला पत्र लिहून पाठविले. त्याकाळातील हे भक्तियुक्त प्रेमपत्र आहे.



KTBS Not to be republished

मूल्य - जिद्द, भक्ती

ऐकोनिया भवन सुंदर सद्‌गुणाते
कानी शिरु हरितो सकल श्रमाते
सौंदर्य जे बघुनी सार्थक लोचनांसी
माझे जडे नाते भवत्‌पदासी ।।1।।

विद्याधिकार कुलशील सुरुपताही
साजेशी तुज जगात कुणीही नाही
जाणीव ही असुनि देव कुलीन कन्या
तूतेचि इच्छित पती म्हणुनि अनन्या ।।2।।

चित्ते करुन तुज मी तव होय जाया
घे धाव सत्वर आता मज वाचवाया
घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा
कोल्हा स्वभाग पळवी ऋचते न सिंहा ।।3।।

केली व्रते नियमही धरिले विशेषी
पूजियले सतत देवगुरु द्विजाशी
न लाविले कधीच विन्मुख याचकाते
ते पुण्य उद्यत करी तुज यावयाते ।।4।।

आले ससैन्य मागदेश विदूरथादी
रक्षावया परिणयातूर भूप चेदी
सर्वा तयास निज बाहू पराक्रमाने
दंडूनि ने मजसी राक्षस पद्धतीने ।।5।।

बंधुसवे झगडल्याविनही हराया
येईल ना मजसि या करिता उपाया
लग्नाआधी नववधू कुलदेवतेसी
वंदू वनी रिघत तेथूनि ने तियेसी ।।6।।



KTBS Not to be republished

इच्छा जरि न पुरली मम पद्मनाभ
देईन जीव सहसा हासडूनी जीभ
घेऊनी जन्मशत उग्र तपे तुझे ते
पावेन पाय शिवही नमितो जयाते ।।7।।

## शब्दार्थ व टीपा :

■ भवन - त्रिभुवन, स्वर्ग, मृत्यू, पाताळ, भुवन, जग ■ भवत्पद - परमेश्वराचे पाय, येथे श्री कृष्णाचे पाय ■ अनन्या - अन् + अन्या, दुसऱ्या कोणालाही नाही ■ चित्ते - मनाने ■ जाया-पत्नी, भार्या ■ ऋचते - आवडे ■ द्विज - ब्राह्मण, विप्र ■ विन्मुख - परत पाठविणे ■ याचक-भिक्षा मागणारा ■ उद्यत - तयार ■ मगदेश-मगध देशाचा राजा (जरासंध) ■ परिणय-विवाह, लग्न ■ भूप- राजा, नृप, नरेश ■ चेदी - एक देश (राज्य) ■ बाहू - हात, भुजा ■ राक्षस - देवांचे शत्रू (विवाहाची एक पद्धत) ■ रिघणे-शिरणे ■ हासडून-खेचून, ओढून, हिरावून, बळजबरीने ■ पद्मनाभ-विष्णू, कृष्ण.

## टीपाः

* राक्षस पद्धतीने - विवाहाच्या आठ पद्धतीपैकी एक या पध्दती (प्रकार) - (1) ब्रह्म (2) दैव (3) आर्श (4) प्रजापत्य (5) गांधर्व (6) आसूर (7) राक्षस (8) पैशाच्य यापैकी राक्षस पद्धतीमध्ये, वधूच्या आई-वडिलांच्या परवानगी शिवाय तिला पळवून नेवून विवाह करणे.
* पद्मनाभ - ज्याच्या नाभीतून म्हणजे बेंबीतून पद्म म्हणजे कमळ उगवले आहे, तो विष्णू. विष्णूचा आठवा अवतार म्हणजे कृष्ण. या कमळात ब्रह्मदेव जन्मला असे मानतात.

## सरळ अर्थ -

हे कृष्णा ! तीनही भुवनात सुंदर असे सद्गुण माझ्या कानावर पडले आणि माझ्या सकल श्रमाचे हरण झाले. (कष्ट संपले). जे सौंदर्य बघून डोळ्याचे सार्थक व्हावे अशा तुझ्या पायाशी माझे डोळे जडले आहेत ।।1।।

सौंदर्य, कुलशील आणि विद्यावान अशी तुला साजेलशी या जगात कुणीही नाही याची जाणीव असूनही मी एक चांगल्या कुळातील कन्या तुलाच पती म्हणून स्वीकारु इच्छिते दुसऱ्या कोणालाही नाही ।।2।।

माझ्या मनाने मी तुझी पत्नी झाले आहे. त्यामुळे मला वाचविण्यासाठी तू ताबडतोब धाव घे. शिशुपाळरुपी कोल्हा केव्हा धाड घालील हे कळेना आणि त्याने तुझ्यासारख्या सिंहाच्या मालकीच्या भागावर धाड घालून पळवून न्यावे हे तुला आवडणार नाही ।।3।।



KTBS Not to be republished

तुझे वर्णन ऐकल्यापासून तुझ्या प्राप्तीसाठी मी अनेक व्रते केली, नियम धरले, देव, गुरु आणि ब्राह्मणांची सतत पूजा केली. दारी आलेल्या कोणाही याचकास परत पाठविले नाही. या सगळ्यातून मला जे पुण्य मिळाले आहे, तेच तुला इकडे यावयास तयार करेल ।।4।।

चेदीचा राजा शिशुपालाचे रक्षण करण्यासाठी मगध देशीचा राजा जरासंध आणि त्याच्याबरोबर विदुरथ वगैरे राजे स्वतःचे सैन्य घेवून आले आहेत तुझ्या बाहू पराक्रमाने त्या सर्वांना शिक्षा करुन मला राक्षस पद्धतीने पळवून ने ।।5।।

माझा भाऊ रुक्मी याच्याशी भांडण केल्याशिवाय माझे हरण करण्याचा दुसरा कोणताही उपाय मला दिसत नाही. आमच्या कुळाच्या पद्धतीप्रमाणे लग्ना आधी कुलदेवतेचे दर्शन घ्यावयाचे असते, त्यासाठी मी वनात शिरणार आहे. तेथून तू मला पळवून ने ।।6।।

हे पद्मनाभा। ही माझी इच्छा पूर्ण झाली नाही तर मी माझी जीभ हासडून जीव देईन. त्यानंतर पुढे शंभर जन्म घेवून उग्र तपश्चर्या करेन आणि प्रत्यक्ष भगवान शंकरही ज्याला वंदन करतो असे तुझे पाय मी मिळवेन. ।।7।।

## अधिक माहिती :

ही संपूर्ण कविता वसंततिलका या अक्षरगणवृत्तात आहे. या वृत्ताच्या प्रत्येक चरणात 14 अक्षरें असतात. व त-भ-ज-ज-ग-ग असे गण असतात. नरेंद्राची रचना थोडीशी शिथिल आहे. कांही ठिकाणी अक्षरांच्या संख्येत फरक अढळतो. तर कांही ठिकाणी गण व्यवस्थित पडत नाहीत याला वृत्तभंग म्हणतात.

### स्वाध्याय

**प्र.1 पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) नरेंद्र कोणाच्या दरबारात कवी होते ?

(2) मूळ ‘रुक्मिणी स्वयंवरांतील ओव्यांची संख्या किती होती ?

(3) रुक्मिणी कोणत्या देशाची राजकन्या होती ?

(4) रुक्मिणीला किती भाऊ होते ?

(5) रुक्मिणीच्या गुरुंचे नाव काय ?

(6) रुक्मिणीने कोणाला विन्मुख पाठविले नाही ?

(7) रुक्मिणीचे लग्न कोणाशी ठरविलेले होते ?

(8) शिव कोणाचे पाय नमितो ?

KTBS Not to be republished

**प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(1) सौंदर्य जे बघुनी ............. लोचनासी.

(2) तूतेची इच्छित ............. म्हणूनी अनन्या.

(3) कोल्हा ............. पळवी ॠचते न सिंहा.

(4) न लाविले कधिच ............. याचकाते.

(5) दंडूनी ने मजसी ............. पद्धतीने.

(6) देईन ............. सहसा हासडूनी जीभ.

(7) इच्छा जरि न पुरली .............

(8) घेऊनी ............. जन्म ............. तुझे ते.

**प्र.3 खालील प्रश्नांची 3/4 वाक्यांत उत्तरे लिहा.**

(1) श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय काय प्रयत्न केले आहेत ?

(2) कृष्णाला काय आवडणार नाही ?

(3) शिशूपालाच्या रक्षणासाठी कोण कोण आले आहेत ?

**प्र.4 खालील प्रश्नांची 5 ते 6 वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे?

(2) आपण श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मिणी त्याला कसे सांगते?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) '' न लाविले कधीच विन्मुख याचकाते.''

(2)''पावेन पाय शिवही नमितो जयाते.''

**प्र.6 खालील प्रश्नाचे उत्तर 7-8 वाक्यात लिहा.**

(1) 'रुक्मिणीचे पत्र' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

KTBS Not to be republished

## भाषाभ्यास

(1) संधी सोडवा प्रकार लिहाः सद्गुण, विद्याधिकार, परिणयातुर, विदूरथादी

(2) विग्रह करुन समास ओळखा - सद्गुण, विद्याधिकार, अनन्या, परिणयातूर, द्विज पद्मनाभ

## उपक्रम

(3) 'रुक्मिणी स्वयंवराची' संपूर्ण कथा तुमच्या शिक्षकांकडून समजून घ्या.

(4) संत एकनाथांचे ''रुक्मिणी स्वयंवर'' हे पुस्तक मिळवून वाचा.

पुढील शब्द असेच लिहा -

| |
|---|
| गृहपाठ, तृतीया, झुळूक |
| क्षितिज, पुटकुळी, दृष्टिक्षेप |

♦ ♦ ♦ ♦

KTBS
Not to be republished